# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 09 January 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०९ जानेवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज ओडिशामधल्या भुवनेश्वर इथं अठराव्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचं औपचारिक उद्घाटन झालं. विकसित भारतात प्रवासी भारतीयांचं योगदान, हे या दिनाचं वाक्य आहे. भारतीय मुळाच्या लोकांनी जगभरातल्या आपल्या कामांमुळे देशाचा गौरव वाढवला असून, हे सर्वजण भारताचे राष्ट्रदूत असल्याचं प्रतिपादन पंतप्रधानांनी यावेळी केलं. प्रवासी भारतीयांमुळे देशाचा मान वाढत असून जगातल्या प्रत्येक देशाचे नेते आपल्या देशातल्या भारतीय समुदायाची प्रशंसा करतात, असं पंतप्रधानांनी सांगितलं. भारताच्या प्रगतीनं वेगाचे सगळे विक्रम मोडीत काढले असून आज जग भारताचं बोलणं लक्षपूर्वक ऐकतं, असंही पंतप्रधान यावेळी म्हणाले.

****

भारतीय अंतराळ संशोधन संस्था –इस्रोनं स्पेडेक्स मोहिमेच्या अंतर्गत पृथ्वीच्या जवळच्या कक्षेत फिरणाऱ्या दोन उपग्रहांचं डॉकिंग म्हणजे जोडणीचा प्रयोग लांबणीवर टाकला आहे. दोन उपग्रहांमधलं अंतर जास्त वाढल्यामुळे हा प्रयोग पुढे ढकलावा लागल्याचं इस्रोनं स्पष्ट केलं आहे. इस्रोनं यापूर्वी हा प्रयोग सात जानेवारीला घेण्याचं जाहीर केलं होतं, मात्र तेव्हाही या वाढलेल्या अंतरामुळे तो पुढे ढकलून आज घेण्याचं जाहीर करण्यात आलं होतं. आता पुढचा प्रयोग कधी होईल हे लवकरच जाहीर केलं जाईल असं इस्रोनं म्हटलं आहे.

****

आंध्रप्रदेशमध्ये तिरुपती इथं झालेल्या चेंगराचेंगरीत सहा जणांचा मृत्यू झाला, तर ४० जण जखमी झाले. तिरुमला तिरुपती देवस्थान समितीने वैकुंठ एकादशी दर्शनासाठी तिरुपती इथं एक लाख २० हजार टोकन वाटपासाठी ९५ कक्ष सुरु केले आहेत. त्यातल्या रामानायडू शाळेजवळच्या कक्षात काल ही दुर्घटना घडली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी तसंच आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी या घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे. नायडू आज दुपारी तिरुपतीला भेट देऊन आढावा घेणार आहेत.

****

मुक्त, पारदर्शक आणि निःपक्षपातीपणे निवडणुका घेण्याची भारतीय निवडणूक आयोगाची उत्कृष्ट परंपरा असून भारत ही जवळपास एक अब्ज मतदार असलेली चैतन्यपूर्ण लोकशाही आहे, असं प्रतिपादन लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी केलं आहे. काल इंग्लंडमध्ये लंडन इथं ब्रिटीश संसदेच्या हाऊस ऑफ कॉमन्सचे अध्यक्ष सर लिंडसे हॉयल यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत ते बोलत होते. निवडणूक प्रक्रियेत महिलांचा उत्साहवर्धक सहभाग अधोरेखित करत, यातून निवडणूक प्रक्रियेतली सर्वसमावेशकता दिसून येते, असं बिर्ला यांनी म्हटलं आहे. भारत आणि ब्रिटनमधलं संसदीय सहकार्य मजबूत करण्याचं आवाहनही बिर्ला यांनी यावेळी केलं.

****

राज्यात ऊस गाळप हंगाम सुरू केलेल्या ९६ सहकारी आणि ९३ खाजगी अशा १८९ साखर कारखान्यांच्या परिसरात साक्षरता वर्ग सुरू झाले आहेत. यात आत्तापर्यंत ४ लाख ९२ हजार निरक्षरांची ऑनलाईन नोंदणी झाली आहे. साखर आयुक्तांच्या सूचनेनुसार हे वर्ग घेण्यात येत आहेत.

****

महाराष्ट्रातल्या कोणत्याही भागातल्या नागरिकाला राज्यातल्या कोणत्याही दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नोंदणी करता यावी यासाठी ‘वन स्टेट वन रजिस्ट्रेशन’ संकल्पना राबवणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. मुंबईत काल महसूल विभागाच्या बैठकीत ते बोलत होते. घरबसल्या दस्त नोंदणी करता यावी, या उद्देशानं महसूल विषयक काही दस्त नोंदणीकरता फेसलेस प्रणाली राबवण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं. राज्यात जमीन मोजणीसाठी जीआयएस तंत्रज्ञानावर आधारित ई-मोजणी लागू करण्यात येणार आहे. भूमी अभिलेख विभागातल्या सर्व सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी पहिल्या टप्प्यात ३० कार्यालयांमध्ये भू प्रमाण केंद्र सुरू करण्यात येणार आहे, अशी माहितीही फडणवीस यांनी दिली.

****

क्षयरोगमुक्त भारत अभियान या कार्यक्रमाअंतर्गत आज नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या शिवाजीनगर रुग्णालयात निक्षय वाहन एक्सरे यंत्राचं अनावरण मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉक्टर महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते करण्यात आलं. नांदेड शहरात टीबी विभागामार्फत ही निक्षय रुग्णवाहिका शहरातल्या नियोजित शिबिरांच्या जागी जाणार असून, तिथे रुग्णांचे एक्स रे काढून रोगनिदान केलं जाणार आहे. या अभियानातून नांदेड शहर टीबीमुक्त करण्याचा मानस डोइफोडे यांनी यावेळी व्यक्त केला.

****

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्येच्या निषेधार्थ आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण इथं मोर्चा काढण्यात आला. हाताला काळी पट्टी बांधलेले अनेक नागरिक या मोर्चात सहभागी झाले.

****

उत्तर भारतात थंडीची लाट आणखी तीव्र झाली आहे. उत्तरेकडच्या राज्यांमध्ये तापमानात आणखी घट होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. राज्यात मराठवाडा आणि विदर्भातही तापमानात लक्षणीय घट झाली आहे.

****